॥ ॐ ॥

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

ऑक्टोबर २०२२

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.
(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४     भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६
Email : wardhinee@gmail.com
Website : http://www.swaroopwardhinee.org

## दीपावलीच्या

## हार्दिक शुभेच्छा

उजळीत फुलवीत चराचराला,
हृदयी आजी रविराज उदेला,
श्रांत विकल या मम जीवाला,
तेज तयाचे दे संजीवन,
आज सरे मम एकाकीपण...
तेजोमय हो अवघे जीवन...

– शांता शेळके

# चऱ्होली कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र



**वास्तुपूजन कार्यक्रम**

चऱ्होली येथील कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीची वास्तुपूजा शनिवार दिनांक ८ ऑक्टोबर रोजी विधिवत संपन्न झाली. संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर माशेलकर, संस्थापक विश्वस्त श्री.श्रीकांत सामळ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये वर्धिनीच्या वतीने सौ. व श्री.राकेश शेंडगे, सौ. व श्री.संदीप मोरे आणि सौ. व श्री.मिलिंद दाते यांनी पूजाविधी संपन्न केली. या प्रसंगी वर्धिनी परिवारातील आणि चऱ्होली ग्रामातील निमंत्रित असे सुमारे १०० जण उपस्थित होते. ज्यांच्या आर्थिक सहकार्यामुळे हे केंद्र प्रत्यक्षात उभे राहिले आहे त्या भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेडचे डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. देवेंद्र जोशी, महा. नॅचरल गॅस लिमिटेडचे संचालक श्री.राजेश पांडे या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन यांनी या प्रकल्पाच्या उभारणीच्या वाटचालीवर प्रकाश टाकला तर श्री. अद्वैत कुलकर्णी यांनी नजीकच्या काळात या वास्तूमध्ये कोणकोणते अभ्यासक्रम व उपक्रम सुरु करण्याचा मानस आहे याविषयी उपस्थितांना माहिती दिली. या प्रसंगाला अनुरूप एका वैयक्तिक गीतानंतर अध्यक्ष डॉक्टर माशेलकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रार्थना आणि स्नेहभोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.



# शाखा विभाग



**राजर्षी शाहू महाराज शाखा -** या महिन्याभरात मुलांकडे दोन वेळा झालेल्या संपर्कात परीक्षेच्या दृष्टीने पालकांशी संवाद साधण्यात आला. पालकसभेचे निरोप देण्यात आले आणि दि. १ ऑक्टोबरला शाखेत जवळपास ४० जणांच्या उपस्थितीत पालक सभा पार पडली. सुरुवातीला वर्धिनीची डॉक्युमेंट्री दाखवण्यात आली. सतीश दादा आणि अक्षय दादा यांनी सहामाही परीक्षेच्या दृष्टीने घरचं वातावरण कसं असावं, परीक्षा कालवधीतील शाखा नियोजन या बाबत पालकांशी संवाद साधला.

**स्वामी ब्रह्मानंद शाखा -** सूर्यनमस्काराच्या योग्य स्थितींचे प्रशिक्षण केतन खेडकर दादाने शाखेत घेतले. २६ सप्टेंबरला सर्व मुलांची आरोग्य चाचणी घेण्यात आली. Activity based learning अंतर्गत ३० सप्टेंबरला गणितातील धन आणि ऋण संख्यामधील फरक ओळखा अशी activity घेण्यात आली. शाखेमध्ये सोमवार ते शुक्रवार गटानुसार परिपाठ घेण्यात आला. शनिवारी ११ वी व १२ वीच्या युवकांनी तर रविवारी F.Y. ते T.Y. च्या युवकांनी परिपाठ घेऊन वर्धकांसमोर परिपाठ सादरीकरणाचे चांगले उदाहरण उभे केले.



**स्वामी श्रद्धानंद शाखा -** २० सप्टेंबरला शाखेतील मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देणारा वर्धन पुस्तिकेतील Lets Draw Emoji हा उपक्रम घेतला. विविध प्रसंग आणि परिस्थितीत मुले Emojis च्या माध्यमातून किती विविध प्रकारे व्यक्त होऊ शकतात हे यातून समजले. २१ सप्टेंबरला अक्षय कदम दादाने वेळेचे नियोजन याविषयी मार्गदर्शन केले.



**धर्मवीर शंभुराजे शाखा -** गणेशोत्सव पथक झाल्यानंतर दि. २८ सप्टेंबरला शाखेवर उत्सवप्रमुख अमोल शेलार दादाच्या मुलाखतीचा कार्यक्रम घेण्यात आला. इयत्ता पाचवीतील वर्धकापासून ते शाखेचा शाखाप्रमुख, युवक प्रमुख, केंद्रीय संपर्क प्रमुख आणि यावर्षीचा उत्सव प्रमुख इथपर्यंतचा प्रवास दादाने उलगडून संगितला.

वर्धिनीच्या संस्कारानुसार शाखेतील प्रणव कुपाटेदादा, अदिराज घंटे, स्वप्निल बिराजदार आणि गौरव सुतार यांचे वाढदिवस शाखेच्या पध्दतीने घरी प्रत्यक्ष भेटून साजरे करण्यात आले. ६ ऑक्टोबरला श्री. सुमित डोळे व शाखेचे शाखापालक श्री. रामकृष्ण चिंचकर यांच्या उपस्थितीत शाखेत पालकसभा घेण्यात आली.

**समर्थ रामकृष्ण शाखा –** मैदान समितीने शाखेत मॅट कुस्ती स्पर्धा आयोजित केली. कुस्तीतील नियम, चांगल्या डावाचे प्रकार, पूर्वतयारी अशा अनेक गोष्टी वर्धकांना यातून समजल्या.



**स्वामी योगानंद शाखेत** नवरात्रीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. १५ सप्टेंबरनंतर वर्धकांच्या आगामी परीक्षांची पूर्वतयारी म्हणून गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयांचे बेसीक पेपर घेण्यात आले.

**स्वामी अखंडानंद शाखा –** गणपती विसर्जनानंतर पथनाट्यावर आधारीत मुळा-मुठा नदी क्षेत्रभेट घेण्यात आली. यात वर्धकांनी नदीपात्राबाहेर ठेवून दिलेल्या अनेक गणेशमूर्तींचे विसर्जन केले, निर्माल्य, कचरा गोळा केला. रोनक खाटेर दादाने नदी कचरा व्यवस्थापनाबद्दल माहिती सांगितली.

## युवती वर्धिका विभाग

### नवरात्र विशेष कार्यक्रम

१ ऑक्टोबरला सन्मान **''आपल्यातील 'ती'चा''** या कार्यक्रमात डॉ. सुरेखा कुडलिंगार ताईने PCOD and Personal Hygiene या विषयावर संवाद साधला. सुरेखा ताईनी आपल्या वर्धिका आणि युवती गटाला PCOD आणि PCOS काय असते, त्याची लक्षणे कशी असतात ते सांगितले. मासिक पाळी का गरजेची आहे आणि ती नियमित आली नाही तर स्त्रीला किती त्रास सहन करावा लागतो हे सांगितले. दैनंदिन जीवनात आहार आणि व्यायामाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाच्या पुढील टप्प्यात वर्धिनीतील काही ज्येष्ठ कार्यकर्त्या पुष्पाताई नडे (सहकार्यवाह), बागेश्री पोंक्षे (ज्येष्ठ कार्यकर्त्या-युवती विभाग), निला कुडलिंगार (ग्रंथपाल), लता सत्तूर (रुग्ण सहाय्यक वर्ग), सुगंधा कबीर (प्रौढ साक्षरता वर्ग) यांचा सन्मान करण्यात आला. वयाची मर्यादा न पाहता गेली कित्येक वर्षे या सर्वजणी वर्धिनीच्या कामात सक्रिय आहेत आणि पुढच्या पिढीला प्रोत्साहन देण्याचे काम करीत आहेत. सर्व उपस्थित वर्धिकांना वर्धिनीतील कर्तबगार महिला आणि त्यांचा कामाची ओळख झाली. सौ. दीपालीताई पवार यांनी सुरेखा कुडलिंगार, तेजश्री शेंडे, उल्का माळी, प्रिया गोरे, चैत्राली हुल्याळकर, वैभवी पवार या व्यावसायिक युवतींचा उपस्थितांना परिचय करून दिला. तेजश्री शेंडे ताईंनी मोठ्या गटातील सर्व वर्धिकांना सॅनिटरी पॅड, लहान मुलींना रायटिंग पॅड भेट म्हणून दिले. कार्यक्रमानंतर नव्या जुन्या पिढीचा गप्पांचा कार्यक्रम रंगला. सदर कार्यक्रमात वर्धिनीच्या महिला शक्तीचा सर्वांना झालेला परिचय प्रेरणा देणारा ठरला.




## उत्थान विभाग




गणेशोत्सव पथनाट्य उपक्रमाशिवाय गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठा वर्ग घेण्यात आला. ज्या अभ्यसिकांचा पथनाट्यात सहभाग नव्हता त्यांनी अथर्वशीर्षपठण, गणेश आरती, चित्रकला स्पर्धा, मूर्ती बनवण्याची कार्यशाळा इ. उपक्रमांमध्ये सहभाग घेतला.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अभ्यासिकेतील मुलांचे एकत्रीकरण शंकर टेकडी बंडगार्डन येथे करण्यात आले. १५ सप्टेंबरनंतर परीक्षेची पूर्वतयारी म्हणून सर्व अभ्यासिकेवर त्रैमासिक परीक्षा घेण्यात आली.








# समुपदेशन विभाग



◆ हुजूरपागा शाळेतील ४५० मुलींच्या गटासाठी ५ सप्टेंबरला सौ. मेघाताई नगरे यांनी **''संवाद तारुण्याशी''** या विषयावर संवाद साधला. उपस्थित शिक्षक, विद्यार्थिनी यांनी विचारलेल्या प्रश्नांची ताईंनी मोकळेपणाने उत्तरे दिली.

◆ २९ सप्टेंबरला माले येथील सेनापती बापट शाळेत 'पंचकोष' या विषयावर सौ. मेघाताई नगरे यांनी तर

◆ ३० सप्टेंबरला 'वेळेचे नियोजन' या विषयावर सुरेखा माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

◆ मुलांसोबतच पालकांसाठीही 'पालकत्व निभावताना' या विषयावर दीपाली थोरात यांच्या मुलाखतीचे आयोजन विभागाने केले.

स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांसाठी 'एकत्व आणि सामुहिकता' या विषयावर सत्राचे आयोजन करण्यात आले. विविध कृती उपक्रम घेऊन मेघाताईंनी उपस्थितांपर्यंत विषय पोहोचवला. स्पर्धा परीक्षांना सामोरे जाताना आरोग्य आणि आहाराचे महत्त्व ताईंनी सांगितले.

◆ वर्धिनीच्या सर्व विभागातील कार्यकर्त्यांसाठी २९ सप्टेंबरला 'Documentation Skill' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. अरुणा कौलगुड यांनी संस्थेच्या ध्येय उद्दिष्टांची स्पष्टता, संस्थेच्या आपल्याकडून असणाऱ्या अपेक्षा, आपल्या विभागाचे वार्षिक आर्थिक अंदाजपत्रक, कागदपत्र आणि दस्तऐवज यांचे महत्त्व अशा अनेक विषयांवर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.









# महिला विभाग

**रुग्ण सहाय्यक वर्ग - माले -** १३ सप्टेंबरला वर्गात टाटा पॉवर कंपनीतर्फे झालेल्या जागतिक पोषक आहार सप्ताह कार्यक्रमासाठी पिरंगुट येथील लोपामुद्रा हॉस्पिटलच्या प्रसूती तज्ज्ञ डॉ. प्रीतम तांबेकर उपस्थित होत्या.

◆ १९ सप्टेंबरला प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्गातील सर्व मुलींचे डोळे तपासण्यात आले. बावधन येथील इंफिगो आय केअर मार्फत हा उपक्रम घेण्यात आला.

◆ २१ तारखेला पुष्पाताई नडे यांनी विद्यार्थिनींना वर्धिनीच्या पार्थनेचा अर्थ सांगून सेवेचे व्रत आपल्यातील प्रत्येकाने आजन्म आचरावे असा मंत्र दिला.

**रुग्ण सहाय्यक वर्ग, पुणे -** नवरात्रीनिमित्त नर्सिंग विभागाने स्त्री-पुरुष समानता या विषयावर अनेक ठिकाणी पथनाट्य सादर केले. पथनाट्य लेखन आणि सादरीकरण याची सर्व जबाबदारी वर्गातील विद्यार्थिनींनी घेतली. पथनाट्याचा हा पहिलाच अनुभव मुलींमधील एकोपा आणि आत्मविश्वास वाढण्यासाठी महत्त्वाचा ठरला.

# पाकोळी बालवाडी



**लहान गट -** मुले प्रार्थना, श्लोक, भजन छान गातात. मुक्त व्यवसाय खेळताना मॅकॅनोचे खेळ एकमेकांना जोडून विविध आकार तयार करतात. बाळाच्या कपड्यांचा परिचय पाठ, जम्पिंग टेबल, घसरगुंडी असे खेळ, चित्र रंगवणे, हाताचे ठसेकाम असे अनेक उपक्रम या महिन्यात घेण्यात आले.

◆ दि. २८ ऑक्टोबरला ओंकार सभागृहात मुलांनी फेर धरून गाणी म्हणत भोंडला साजरा केला.

**मोठा गट -** "गणपती बाप्पा मोरया" या गणरायाच्या जयघोषात, ढोल ताशांच्या आवाजात आणि पावसाच्या सरीतून गणपती बाप्पांचे स्वागत झाले. मंडळा मंडळात जाऊन मुलांनी अथर्वशीर्ष पठण केले. मंडळात जाताना बालचमूचा गणेशाचा जयघोष ऐकून रस्त्यावरील अनेकजण मुलांकडे कौतुकाने पाहत होते.

◆ ५ सप्टेंबरला शिक्षक दिनानिमित्त मोठ्या गटातील मुले शिक्षकांच्या वेशभूषेत आली होती.

◆ बघता बघता नवरात्र आले. सर्वत्र 'अंबामाता की जय'चा घोष सुरू झाला. नवरात्रीनिमित्त परडीमध्ये गहू, ज्वारी, बाजरी, मातीमध्ये पेरून घेतले. मुलांनी त्याचे रोज निरीक्षण केल्याने धान्य कसे उगवते, ते मुलांना समजले.

◆ या महिन्यात एकत्रित धान्य वेगळे करणे, कारागिरांचा परिचय, पाळीव प्राणी, जंगली प्राणी, रंगांचा परिचय, शरीराच्या अवयवांची ओळख हे पाठ घेण्यात आले.







